Vol 2 Issue 2 Aug 2012

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 2, Aug 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# समाजसुधारक महात्मा फुले आणि स्त्रीशिक्षण

*अनिल माणिकराव बैसाणे*

इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

**प्रास्ताविक :**

आधुनिक महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलून टाकण्यासाठी ज्या अनेक महापुरुषांनी आपले जीवन व्यतीत केले त्यामध्ये ज्योतिबा फुले हे पहिले क्रांतीकारक महापुरुष होत. 19 व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात इंग्रजी सत्ता स्थापन झाली. या परकीय सत्तेच्या आगमनाने महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकिय, धार्मिक, वाङ्मयीन जीवनात हळूहळू परिवर्तन होण्यास सुरूवात झाली. महाराष्ट्रात नव्या युगात खऱ्या अर्थाने सुरूवात झाली परंतु हा सामाजिक बदल उच्चभ्रू लोकातच होऊ लागला. बहुजन समाज हा बदलापासून अलिप्त राहील. ग्रामीण महाराष्ट्राचा गावगाडा पूर्वीच्याच सामाजिक चौकटीत जखडला गेला होता. हा समाज अंधारातच चाचपडत होता. गुलामगिरीचे पाश शुद्र व अतिशुद्र समाजाच्या गळ्याभोवती जखडले होते. तेव्हा त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन घाव घालणे आवश्यक होते तेव्हा या वर्गाच्या उद्धाराच्या तळमळीतून प्रस्थापित व्यवस्थेशी कोणतीही किंमत देऊन टक्कर देणऱ्या क्रांतीकारक पुरुषाची गरज होती. ती गरज महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्वीकारली.

### शिक्षण

ज्याला आपण शिक्षण म्हणतो तो ज्योतिपूर्व काळात मुळातच अस्तित्वात नव्हते. तरीसुद्धा गोविंदरावांनी ज्योतिबाला मोठ्या प्रयत्नाने प्राथमिक शाळेत दाखल केले. या बुद्धिमान, हुशार व तरतरीत, उत्साही विद्यार्थ्याने अभ्यासात चांगली प्रगती केली. पण ज्योतिबाच्या या शिक्षणाविषयी नतद्रष्टांनी कान फुंकले आणि ज्योतिबाला शाळेतून काढण्यात आले. शिक्षणाने मुले बंडखोर बनतात, बिघडतात, धर्मभ्रष्ट होतात व स्वतःचा व्यवसाय करीत नाहीत. हे विचार गोविंदरावांना पटले आणि ज्योतिबांचे शिक्षण सुटले. परंतु खंडीत झालेले शिक्षण पुन्हा सुरू करण्याचा योग ज्योतिबाला गफारबेन मुन्शी गुरूजी यांच्या सांगण्यावरून प्राप्त झाला. वयाच्या 14 व्या वर्षी पुन्हा ज्योतिबा शाळेत जाऊ लागले.

शाळेत असतांना ज्योतिबांची मैत्री गोंवडे या हुशार व महत्वाकांशी तरूणाशी झाली. दोघांनी शिवाजी महाराज व जॉर्ज वॉशिग्टनच्या आत्मचरित्रांचा चांगला अभ्यास केला व त्यांच्या विचाराने ते प्रभावित झाले. या थोर पुरूषांच्या स्वदेशप्रेम, विरभक्ती, उदार दृष्टिकोनाने ज्योतिबा प्रेरीत झाले. आणि मायभूमीच्या व देशबांधवांच्या उद्धारासाठी आपले जीवन समर्पित करण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी समाजाच्या सर्वच थरात वैचारिक क्रांती घडवून आणण्यासाठी ते कटिबद्ध झाले. याशिवाय थॉमस पेन नावाच्या विचारवंताच्या राईट ऑफ मॅन या ग्रंथातील उदात्त विचारांचा मोठा प्रभाव पडला. देशबांधवांच्या उद्धारासाठी सर्व आयुष्य वेचण्याचे त्यांनी ठरविले, त्यामुळेच ब्रिटिश सत्तेविरूद्ध बंड करून स्वातंत्र्यप्राप्तीच्या नवविचारांचे बीजे पेरण्याचे कार्य सुरू झाले.

खिश्चन व इस्लामी धर्माच्या तौलनिक अभ्यासाचाही ज्योतिबांवर मोठा प्रभाव पडला. त्यामुळे ईश्वराचे खरे स्वरूप धर्म, धर्म सहिष्णूवृत्ती इत्यादी कल्पना ज्योतिबांच्या वाढीस लागल्या व सत्यशोधक समाजाच्या स्थपनेस त्यांचा उपयोग झाला. शस्त्रविद्या पारंगत लहुजीबुवा यांच्याकडून ज्योतीबाने नेमबाजी, दांडपट्टा इत्यादींचे शिक्षण घेतले. परंतु मुठभर तरूणांच्या संघटनेने ब्रिटिश सत्तेला विरोध करणे सोपे नव्हते. हे ज्योतिबांनी ओळखले व शास्त्रक्रांती करून ब्रिटिश सत्तेला नमविण्याचा मार्ग सोडून दिला आणि सामाजिक क्रांतीद्वारे समाजाचे स्वरूप बदलण्याचे ठरविले, त्याचप्रमाणे लोकसेवेचे खडतर व्रत त्यांनी स्वीकारले. अखेरपर्यंत ते आपल्या हाती घेतलेल्या कार्याशी एकनिष्ठ राहीले. सामाजिक कार्य करीत असतांना अनेक धर्ममार्तंड सनातनी मंडळींनी ज्योतिबांची निंदानालस्ती, टवाळी, मानहानी केली. पण ते स्वीकारलेल्या कार्यापासून तसूभरही ढळले नाहीत. सामाजिक उद्धारांच्या कार्यामुळे मुंबईकर मंडळींनी म. फुले यांना इ.स. 1888 मध्ये महात्मा ही पदवी देऊन गौरव केला. त्यांनी केलेल्या विविध सुधारणा पुढीलप्रमाणे –

### स्त्रियांचा उद्धार

महाराष्ट्रात या काळात स्त्रियांची समाजातील स्थिती अतिशय हालाखीची होती. स्त्रियांना समाजात हीन दर्जा होता. त्यांची स्थिती सोचनीय होती. स्त्री ही सुखाची, उपभोगाची वस्तू अशी कल्पना समाजात रूढ होती. स्त्री पुरूषापेक्षा कनिष्ठ, चूल आणि मुल एवढेच स्त्रीचे कार्य असे मानले जात होते. स्त्री ही कुटुंबाचा घटक आहे. ती अर्धांगिनी आहे असे मानले जात होते. पण प्रत्यक्षात स्त्रीची अवस्था दयनीय होती. स्त्री ही

Please cite this Article as : *अनिल माणिकराव बैसाणे* , *समाजसुधारक महात्मा फुले आणि स्त्रीशिक्षण* :
Golden Research Thoughts (Aug. ; 2012)

शिक्षणापासून पूर्ण वंचित होती. स्त्रीने शिकू नये ती शिकल्यास भ्रष्ट होते. शिक्षणही भ्रष्ट होते. अशा भेंगळ कल्पना समाजात रूढ होत्या. बालविधवांना पुर्नविवाहाची परवानगी नव्हती. पतीच्या मृत्युनंतर स्त्रीने सती गेले पाहिजे असे बंधन होते. समाजात जरठ विवाह 10 वर्षाची मुलगी व 80 वर्षाचा पुरुष अशी अनिष्ठ विवाह पद्धत रूढ होती. विधवा स्त्रियांची संख्या समाजात मोठी होती. अशा स्त्रियांना केशवपन करण्याची सक्ती केली जात असे. त्यांनी चांगली कपडे घालू नयेत. समारंभात फिरू नये असे निर्बंध होते. तेव्हा अशा स्त्रियांना परमार्थ साधनेत आयुष्य घालू नये. समारंभात फिरू नये असे निर्बंध होते. तेव्हा अशा स्त्रियांना परमार्थ साधनेत आयुष्य घालविण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. विधवा स्त्रीचे पाऊल वाकडे पडले तर, तिला कडक शासन होत असे. अशा व्यवस्थेत म. फुलेंना स्त्रीजातीबद्दल कळवळा आला. स्त्री ही समाजाचे मूळ आहे. तेव्हा तिच्या उद्धारासाठी व तिचे दुःख निवारण्यासाठी ज्योतिबांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले. तसेच उच्च वर्णातील स्त्रियांचीही स्थिती फार चांगली नव्हती तेव्हा स्त्रियांचा कैवार घेतांना ज्योतिबांनी जातिपातीचा विचार केला नाही. त्यामुळे सर्व जातीतील स्त्रियांचा उद्धार झाला.

### *स्त्रीशिक्षण*

ज्योतिबांनी समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून स्त्रीशिक्षण प्रथम हाती घेतले. स्त्रीने शिक्षण घेतले तर तिला अकालीच वैधव्य येईल. अशी समजूत होती. अशा परिस्थितीत म. फुले यांना मिशनऱ्यांनी भारतात सेवाभावाने चालविलेले शैक्षणिक कार्य पाहून प्रेरणा मिळाली. स्त्री ही समाजाचे मुळ आहे. नवसमाज निर्मितीसाठी स्त्री शिक्षण गरजेचे आहे. त्यासाठी स्त्री ही स्वतंत्र असली पाहिजे. स्त्रियांना ज्ञानाचे दरवाजे खुले करून दिले पाहिजेत, स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा होण्यासाठी त्यांना शिक्षण आवश्यक आहे. स्त्रीशिक्षणाविषयी अनेक गैरसमजूती रूढ होत्या. स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म व समाज यांच्याविरूद्ध वर्तन करणे होय. तेव्हा स्त्रीशिक्षण म्हणजे हिंदू धर्मावर भयंकर अत्याचार या सनातन्यांच्या समजुतीमुळे स्त्रियांना शाळेचे दरवाजे बंद होते.

तेव्हा ज्योतिबांनी स्त्री शिक्षणाचे महत्व ओळखले, त्याबाबतीत फुले म्हणत असत, 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी' म्हणजे एक माता हजारो शिक्षकांपेक्षा मोठे कार्य करू शकते. म्हणून स्त्री प्रथम शिकली पाहिजे. स्त्रीशिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांचे शिक्षण होय. आपण पुरुषाला शिक्षण दिले तर ते एका व्यक्तीला दिल्यासारखे आहे. परंतु एका स्त्रीला शिक्षण दिले तर एका कुटुंबाला शिक्षण दिल्यासारखे आहे. हे फुल्यांनी ओळखून स्त्रीशिक्षणाचे कार्य प्रथम हाती घेतले. स्त्री ही पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे. गुरूमाता गरीयसी हा विचार प्रमुख मानून स्त्री शिक्षणाला पुण्यात प्रारंभ केला.

### *मुलींसाठी पहिली शाळा*

म. फुल्यांनी इ.स. 1848 मध्ये पुणे येथे मुलींची पहिली शाळा सुरू केली, बुधवार पेठेतील भिडे वाड्यात ती प्रथम सुरू झाली. त्यामध्ये महार, मांग, चांभार, इत्यादी शुद्र व अतीशुद्र समाजातील स्त्रीया शिक्षण घेऊ लागल्या. इ.स.1851 मध्ये मित्रमंडळीच्या साहय्याने फुलेंनी चिपळूणकर यांच्या वाड्यात मुलींची ही शाळा सुरू केली परंतु या शाळेसाठी स्त्री शिक्षिका मिळेना तेव्हा ज्योतिबांनी आपली धर्मपत्नी सावित्रीबाई हिला शिकवून तयार केले व पतीच्या सामाजिक कार्यास वाहून घेतले.

### *अस्पृष्यांचे शिक्षण*

शिक्षणाचा प्रसार खालच्या वर्गात केला तरच सार्वत्रिक क्रांती होईल या उद्देशाने ज्योतिरावांनी इ.स.1851 मध्ये अस्पृश्य मुलांसाठी पहिली शाळा काढली. शेकडो वर्षे अज्ञान, अंधःकारात कुजत पडलेल्या अस्पृश्यांना ज्ञानाचे दरवाजे उघडून देणारा म. फुले हा पहिला महाराष्ट्रीयन समाजसुधारक होय, तेव्हा सामाजिक समतेच्या या पुजाऱ्याने शिक्षणाशिवाय अस्पृश्याची सुधारणा होणे शक्य नाही. हे ओळखून निर्धाराने लोकक्षोभ पत्करूनही अस्पृश्य निवाराणाचे कार्य हाती घेतले. अस्पृश्यांना समता, बंधुभाव व स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी जातीयतेची बंधने झुगारून दिली. त्यांना माणूस म्हणून जगण्यास समर्थ बनावे यासाठी अस्पृश्य समाजाला शिक्षण देण्याचे ठरविले. त्यासाठी अस्पृश्यांची मुलींसाठी पहिली शाळा, इ.स. 1852 मध्ये वेताळ पेठेत शाळा सुरू केली. तसेच दक्षिणाप्राईज फंडातून या शाळांना दरमहा 25 रूपये मदत मिळू लागली. सर्वांनी स्वार्थापोटी जातीव्यवस्था निर्माण करून सुखसोयी व सवलती आपल्यासाठी करून ठेवल्या व शूद्र आणि अतिशूद्र यांना गुलामगिरीच्या खाईत लोटले. परंतु हे सर्व ढोंग फुल्यांनी आपल्या लिखाणाद्वारे समाजासमोर मांडले आणि शिक्षणाद्वारे अस्पृश्यांना आपला उद्धार करण्याचा मार्ग दाखवून दिला.

### *संदर्भसूची*

1.ऑम्व्हेट गेल, ज्योतिबा फुले आणि महिला मुक्ती, पुणे 2003.
2.सामाजिक तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे, 2003.
3.ऑम्व्हेट गेल, ज्योतिबा फुले आणि स्त्रकी मुक्तीचा विचार, लोकवाङ्मयगृह, मुंबई, 1990.
4.गायकवाड प्रदीप (संपा.), दलितांचे शिक्षण, नागपूर, 2004.
5.गोखले प्रदीप, विषमतेचा पुरस्कर्ता मनू, पुणे, 2005.
6.देशमुख शारदा, शिवकाळातील व पेशवाईतील स्त्री जीवन, पुणे, 1979.
7.धारणकर सरल आणि इतर (संपा.), स्त्रीजीवनविषयक स्थित्यंतर, नाशिक, 2004.
8.आंबेडकर बाबासाहेब, हिंदु स्त्रियांची उन्नती आणि अवनती, सुगावा प्रकाशन, पुणे, 2009.
9.करमकर प्रीती, स्त्रीवादी सिद्धांकन आणि ज्ञाननिर्मिती (अनु. चव्हाण प्रवीण), स्त्री अभ्यास केंद्र, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, 1999.
10.काणे पा. वा., धर्मशास्त्राचा इतिहास (पूर्वार्ध), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1980.
11.गवळी पी. ए., पेशवेकालीन महाराष्ट्र, औरंगाबाद, 2000.
12.मुन मिनाक्षी, फुले आंबेडकरी स्त्रीचळवळ, समता प्रकाशन, नागपूर, चतुर्थ आवृत्ती, 2011.



***अनिल माणिकराव बैसाणे***
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net